।। प्रकरण चौथे 'ब' ।।

## प्रकरण चौथे 'ब'
## प्रतिक्षा या कादंबरीच्या कथानकाची रचना

ही कादंबरी भारत- पाक युद्धातील मानवी जीवनातील घटना कशा घडत जातात . त्यामुळे कादंबरीचा आशय एखादया वास्तव युद्धाचे वर्णन कादंबरीत घडते. असा भास होतो. युद्धात पाक सैन्य पॅराट्रूप्स कशा उतरल्या जातात . त्याचा शोध घेत असताना कादंबरीच्या शेवटी चांगले आणि वाईट परिणाम घडत जातात. कादंबरी वाचत असताना वाचक काही क्षण विचार करू लागतो.

" प्रतिक्षा " या कादंबरीत ज्या युद्धातील जसे घडले तशी एक घटना उभी केली जाते. त्यातून पुढे काय घडत जाते त्याचा वेध वाचकास लावणारे कथानकातील घटना, प्रसंग, अडथळा त्यातून मार्ग , त्यातून वाचकाची उत्कंठा जागृत करण्याचा लेखक शैलीत वास्तव जीवनात वाचकांना घेऊन जातो.

या कादंबरीत लेखक आपल्या भूमीकेतून निवेदक मनातील विचार प्रतिक्षा या कादंबरीत मांडतो. त्याच प्रमाणे त्याची प्रिय असणा-या कल्पनेच्या आठवणी , तीच्याशी लहानपणी तो खेळतो, तीच्याशी पत्रव्यवहार तो करतो. पुन्हा कल्पनेच्या वडिलांशी लग्नाविषयी विचारले असता नकारात्मक आलेले उत्तर शेवटी निवेदकाच्या वडिलांकडून कल्पनेचे लग्न ठरले आहे. इत्यादी आठवणींनां उजाळा देत तो भारत पाक युद्धातील घटनामध्ये वावरताना दिसतो.

पाक सैनिक भारतात पॅराट्रूप्स कशा उतरल्या जातात त्याचा शोध करीत असताना काहींना कैद होते. तर काही पोलीसांच्या हातावर तुरी देऊन जातात. तर काही सैन्य भारतीय दवाखान्यात असताना त्यांचे अपहरण केले जाते. त्यावेळी डॉ. बत्रा आणि त्यांचा रक्षक यांना ठार केले जाते. पॅराट्रूप्स मीरठला उतरल्या जातात . शेटजीच्या गाडीची भांडणे सांगीतली जातात. त्याचा शोध निवेदक व यश शोधून काढतो. प्रताप ड्रायव्हर कडून त्या पाक अधिकारी व पाक सैनिकांचा शोध घेतला जातो. त्यासाठी निवेदक व यश सापडतात आणि त्यांचा पाक अधिकारी यमुना ब्रीज उडवण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. परंतु शेवटी यशने स्वतःचा जीव धोक्यात घालून यमुना ब्रीजला महत्वाचा जोडणारा मार्ग शिवाय त्यादिवशी सर सेनापती त्यावेळी येणार असतात शिवाय रेल्वे कर्मचारी इत्यादींचा जीव वाचवून स्वतःचा स्वतः ती गाडी घेऊन पूल संपतो तो संपतो त्या गाडीचा स्फोट होतो

[library stamp, illegible]

त्यामध्ये यश मृत्यू पावतो आणि निवेदक मेजर हुसेन यांच्या हालचाली होऊन ते दोघे यमुनेच्या मोकळया पात्रात पडतात त्या दोघांनाही लागते. आणि दवाखान्यात ॲडमीट केले जाते. आणि पाक सैन्य भारताला शरण येतात आणि युद्ध संपते.

अशारितीने लेखक (निवेदकाचा )विचार मांडतो. युद्धात सुद्धा माणुसकी शोधण्याचा प्रयत्न केला जातो. शेवटी घटना आणि प्रसंग निवेदक आपल्या कल्पना विश्वात संचार करू लागतो.

**व्यक्तिचित्रण :**

मानवी स्वभावाचे विविध नमुने कादंबरीत चितारले जातात. यांस व्यक्तिचित्रण किंवा चरित्रचित्रण असे म्हणतात. हे व्यक्तिचित्रण जितके सहज स्वाभाविक असेल तितकी ही कादंबरी उठावदार होईल. मानवी स्वभावाचे कोडे उलगडून दाखविणे व त्या स्वभावाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणे हे कादंबरीकार करीत असतो. [1] त्यामुळे घटनापेक्षा व्यक्तिचित्रणाला अधिक महत्त्व असते.

**निवेदक :**

हा म्हणजे ' मी ' हा या कादंबरी त वावारताना दिसतो. " प्रतिक्षा" या कादंबरीतील मुख्य पात्र -" श्रीयुत माथूर या नावाने इन्किलाब वृत्तपत्राचे वार्ताहर म्हणून ओळख करून दिली जाते. "[2] अशाप्रकारे त्याला पाठीमागून माथूर म्हणून हाक मारली जाते. " पाक सैनिक अधिकारी मेजर हुसेन हसून म्हणाले " मिस्टर माथूर , तुम्हांला त्रास देण्याबद्दल मी दिलगिर आहे.

अशा प्रकारे ' माथूर ' या नावाने कांदबरीत तिस-यांदा त्या नावाचा उच्चार केला जातो.

विमानातून खाली दिसणा-या नगरीचे वर्णन शिवाय पॅराशूट उघडून खाली येताना प्रत्यक्ष निवेदक सुरूवातीला व शेवटी सांगून जातो. 'काही पाकिस्तानी पॅराशुट उतरल्या जातात त्याचा शोध घेण्यासाठी त्याला पाठविले जाते. पॅराशुटचा शोध घेत असताना त्याला रस्त्यामध्ये दोस्त भेटतो. तो म्हणजे यश चौधरी . त्या दोघांनी मिळून पॅराशुट कोठे उतरले आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. ते शोधुन घेण्यासाठी त्याला विविध अनुभव तो सांगुन जातो.

काही काही वेळा या निवेदकाला त्याच्या मनामध्ये आलेल्या कल्पना म्हणजेच ती प्रिय असणारी कल्पना अगदी लहानपणापासून तो तिच्याबरोबर खेळतो. बागडतो, तिच्यावर त्याचे प्रेम बसते. तिच्या आठवणी माथूर (निवेदक) जाता जाता सांगून जातो. तिची गाठ घेण्यासाठीचा प्रयत्न , लग्नसाठी त्याची उत्सुकता, त्यासाठी कल्पनेच्या वडिलांची तो गाठ घेतो. त्यावेळी तिच्या वडिलांकडून आलेले उत्तर - " माझी मुलगी सैन्यातल्या अधिका-याची पत्नी व्हावी असं मला वाटत नाही. " असे नकारात्मक उत्तर त्यामुळे तो नाराज झाला. कल्पनेशी केलेला पत्रव्यवहार शेवटी तिचे उत्तर आलेच नाही.

निवेदक मित्राच्या घरी जातो. म्हणजेच यश चौधरींच्या घरी जातो. त्यावेळी त्याच्या घरात त्याची बायको छोटा मुन्ना, त्याचे वडील इत्यादींची ओळख होते. योगायोगाने त्याला यशचौधरींची पत्नी भेटायला येते. त्यावेळी ती विधवा झालेली असते. हे पाहून त्याला यशच्या मुन्नाची आठवण येते. त्या आठवणीनेच निवेदकाच्या पोटात कळ येते. नर्सही त्याला लगबगीने इंजेक्शन देते. आणि तो झोपू लागतो. तो कल्पनेच्या विश्वात जातो " ह्या विश्वाचा स्वामी मी आहे. "

**यश चौधरी :**

" मी यश चौधरी। दिल्लीच्या सी.आय डी. खात्यात काम करतो " निवेदक आणि त्याची गाठ पडते. निवेदक व यश चौधरी या दोघांनी मिळून पाक- पॅराशुटचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.

यशचौधरी ' माथूर' ही या मित्राला जीवनाचा इतिहास सांगतो. त्यावेळी " माझी आई गर्दीत गाडीत चढू शकली नाही. आम्ही गाडीतून उतरू शकलो नाही. माझी आई हरवली ती कायमचीच "[3] त्याशिवाय आपल्या देशाला फाळणी करण्याचा अधिकार कोणी दिला. इत्यादी विषयांची यश आणि निवेदक यांची चर्चा होते.

मीरठला पाकसैनिकांची पॅराशुट उतरल्या त्यांचा शोध घेण्यासाठी यश व निवेदक गेले असता. पाक सैनिकांच्या गाडीचा पेट्रोल टाकीचा नट यशने ढीला केला. त्यावेळी पोलीस व पाक सैनिक यांच्यात गोळीबार झाला. इत्यादी प्रसंग, गाडी शोधण्याचा प्रयत्न , हरिप्रसाद वर्मा या बंगल्याचा शोध, शेवटी पाक सैनिकांना यश व माथूर सापडतात. त्यांना पाक अधिकारी शिक्षा देतात. परंतु उत्तर देत नाहीत. म्हणून यश व माथूर या दोघांचा उपयोग जमुना ब्रिज उडवण्यासाठी उपयोग करून घेतला जातो. परंतु ते कार्य होऊ शकत नाही. मात्र यश गाडीतील

दारुगोळा आहे. हे निवेदकाने म्हणल्याबरोबर गाडी येऊन भरदार वेगाने जातो. शेवटी पूल संपतो आणि गाडीचा स्फोट होतो. त्यामध्ये यश मृत्यू पावतो.

**कर्नल नायक :**

भारतीय सेनादलाचे काम पहाणारी मुख्य व्यक्तिरेखा पाक पॅराशूट उतरल्या जातात. त्यांच्याकडून काही दारुगोळा यांचा शोध घेण्यासाठी पोलिस इन्सपेक्टर मेहरा , सी. आय. डी. यश, माथूर (निवेदक) इत्यादीच्या सहकार्याने ज्या ठिकाणी पाक पॅराशॅट उतरले आहेत त्यांचा शोध घेऊन मोठी शहरे रेडिओ स्टेशन पॉवर हाऊस, यमुना ब्रिज इ. ठिकाणांना संरक्षण करण्याचे आदेश देतात.

**डॉ. बत्रा**

'हे सीनिअर मेडिकल आफिसर. आम्ही त्यांना सरप्लस मेडिकल ऑफिसर म्हणत असत.' युध्दाच्या वेळी सैनिकांना औषध पाण्याची उपचाराची ते कामे करीत असत. त्यांच्याकडे पाक पॅराशूटचे तीन सैनिक ॲडमिट केले होते. डॉक्टरांच्यासाठी एक संरक्षक काची नेमणूक होती. त्या तीन पाक पॅराशूटपैकी मेजर हुसेन असावेत त्यांना पळवून नेण्याचा प्रयत्न पाक सैनिकांनी केला त्या वेळी डॉ. बत्रा व संरक्षक यांना पाक सैनिकांनी ठार केले. व त्या तीन पाक सैनिकांचे अपहरण केले.

**मेजर हुसेन :**

ही व्यक्तिरेखा ' भारताच्या फाळणीपूर्वी मी भारतात रहात होतो. दिल्लीतच यमुना ब्रिजशेजारी घर होते. खूप दिवसाची इच्छा होती भारतात यावे. तेथे मी शिकलो. ती शाळा पहावी आमचे घर पहावे . दिल्लीत माझे नातेवाईक कमी नाहीत.' परंतु हे भारत पाक फाळणी झाल्यानंतर पाकिस्तान सैन्यात भरती झाले. ते पाक सैन्याचे मेजर म्हणून ते भारतात आले. त्यांची यश व माथूर रस्त्यामध्ये गाठ पडली. तरीसुध्दा त्यांनी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन गेले नंतर त्यांना यश व माथूर पाक अधिका-यांना ते सापडले. त्यांनी त्यांना कमी शिक्षा दिली. त्यांनी त्यांचा नियोजितपूर्व यमुना ब्रिज उडवण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना अपयश आले. शेवटी ते भारताला शरण आले.

**गौणपात्र :**

यशची बायको, लहान मुन्ना, इन्स्पेक्टर मेहरा, प्रताप, सुभेदार, कासीम, व्यापारी, सरदारजी जे. सी. ओ. पोलीस, दवाखान्यातील नर्स, इ. गौणपात्रे कादंबरीत वावरताना दिसतात.

शिवाय निवदेकाच्या कल्पनेतून आलेली कल्पना, त्रीचे वडील, निवेदकाचे वडील इ. पात्रे कादंबरीत वावरताना दिसतात.

प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीत भारत-पाक युद्धातील व्यक्तीरेखा आपआपले काम नेमुन दिल्यासारखे करतात. प्रत्येक व्यक्तिरेखा ज्याच्या त्याच्यापरीने कादंबरीत काम करताना दिसतात. पॅराट्रूपर्सच्या होणा-या हालचाली शिवाय घडणा-या घटना वाचकासमोर उभा करून जणू भारत-पाक युद्धच वाचकाच्या दृष्टीसमोर उभे केल्याचा भास प्रभाकर पेंढारकरांनी जणु भारत-पाक युद्धच वाचकासमोर उभे करण्याचा प्रयत्न पात्रांच्याद्वारे करतात.

**वर्णनातील अचुकता :**

मराठी साहित्यात कादंबरीच्या आशयात वर्णनातील अचुकता आशयाचे खरे प्रत्येक लेखकाला जमतेच असे नाही. मात्र प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीमध्ये योग्य रितीने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आशयानुरूप व्यक्तिचे बोलणे, चालणे ज्याप्रमाणे आशयानुरूप वातावरण, प्रसंग, निसर्ग वर्णन इ. तून व्यक्तिंची शैली कळते.

निवेदक स्वतः लेखक करीत असतो. परंतु लेखक बाजूला रहातो. तो पात्रातून आपला परिचय करून दाखवितो. आणि कादंबरीत घटना, स्थळ, वेळ, मांडण्याचा प्रयत्न योग्यरितीने केला जातो. ज्याप्रमाणे वास्तवात जसे घडते. त्याचा भास दाखवून शब्दरचनेचे कौशल्य, पात्रांचा स्वभाव, पात्रांचा अधिकार त्याप्रमाणे कादंबरीत वावरताना दिसतो.

सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत व्यक्ति आशयानुरूप संवादरूपाने शेवट पर्यंत चालतात. ती कादंबरी सुखात्मक शोधण्याचा किंवा शोकांतिक शोधण्याचा प्रयत्न प्रभाकर पेंढारकरांनी कादंबरीत केलेला दिसून येतो.

कादंबरीत शुल्लक गोष्टीच्या सुद्धा नोंदी केलेल्या आहेत. उदा : गाडी चोरीला गेली, तिचा नंबर,

तिचा रंग, इ. बारीकसारीक गोष्टी लेखकाच्या लिखाणात येत असतात. ते दाखविण्याचा प्रयत्न पेंढारकर करतात. लेखकाने प्रत्यक्ष युद्धाचे वर्णन करीत असताना शत्रुच्या विमानाचे लक्ष देशातल्या विमानतळाकडे होते, आणि तेथून काही मैलावर असलेल्या एअर फोर्स स्टेशनवर केव्हाही बॉम्ब पडण्याची शक्यता होती. पाक वैमानिकाचा काही भरवसा नाही, - मी स्वतःशीच म्हणालो एअर फोर्स स्टेशनवर केव्हाही बॉम्ब पडण्याची शक्यता होती. पाक वैमानिक काही भास होत नाही, म्हणून स्वतःशीच म्हणालो एअरफोर्स स्टेशनवर टाकलेला बॉम्ब पाच मैल दुर असल्याने हा ब्रिगेड हेड क्वार्टर्सवर नेमका पडायचा।

'पंधरा मिनिटे कशी गेली श्वास रोखून आम्ही पहात होतो. विमानाचा दुरून येणारा आवाज ऐकू येऊ लागला. हळूहळू हा आवाज मोठा होत चालला. विमान आमच्याच बाजूला येत होते. तृतीयेच्या शनि प्रकाशात विमानाची आकृती आकाशात दिसू लागली. विमानाचे दिवे बंद होते. पण ते डायकोट आहे हे ओळखणे अवघड नव्हते. पाक पॅरा ड्रायपिंगसाठी वापरण्यात आलेले सी. ।।3 नव्हते, हे माझ्या लक्षात आले.

अशारितीने प्रभाकर पेंढारकरांनी जसे युद्धातील पॅराट्रूपर्स उतरण्याचे प्रत्यक्ष वर्णन कादंबरीत जसे घडले तसे कादंबरीत आले आहे. युद्धातील प्रत्यक्ष प्रसंग भारत-पाक युद्ध वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला.

**उत्कंठावर्धक :**

मराठी साहित्यात कादंबरीमध्ये कथा आशयानुरूप तेथील व्यक्ति प्रसंगातुन वाचकाची उत्कंठा साधण्याचा प्रयत्न प्रत्येक कादंबरीकार ज्याच्या त्याच्यापरिने आपल्या कादंबरीत करण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. त्याशिवाय वाचकाला कादंबरी वाचत असताना पुढे काय? अशी उत्कंठा लागल्याशिवाय ती कादंबरी परिपूर्ण होऊ शकत नाही. हेच त्या लेखकाचे वैशिष्टय त्या कादंबरीच्या आशयामध्ये सामावलेले आहे.

कादंबरी वाचत असताना वाचकाला वेड लावण्याचे कौशल्य कादंबरीकार उत्कंठेतून करीत असतो. लेखक उत्कटतेसाठी अनेक प्रसंगाची निर्मिती करतो. निसर्ग, वेळ, त्या व्यक्तीचे शब्दरचनेचे कौशल्य इ. तून कादंबरीत उत्कटता लावण्याचे श्रेय लेखक आपल्यापरिने व्यक्त करीत असतो.

उदा : पॅराट्रूपर्स उतरविण्याचा प्रसंग, भारतीय अधिका-यांची गाडी थांबवून पाक सैनिक काही अंतर

प्रवास करतात, निवेदक हरीप्रसाद बंगल्यात मागून गेल्याचा प्रसंग, यमुना ब्रिज उडविण्याचा प्रसंग, अशारितीने रसिकाची उत्कंठा वाढविण्याचा प्रयत्न यशस्वीरित्या प्रभाकर पेंढारकर यांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीत केलेला दिसून येतो.

**संवाद :**

प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीमध्ये योग्य रितीने संवाद आलेले आहे. त्यांनी संवादामध्ये हिंदी व इंग्रजी भाषेचा वापर केलेला दिसून येतो. संवादातून व्यक्तिची ओळख करून दिली जाते. व्यक्तिचे अगदी बारीकसारीक बारकावे इ. गोष्टींचा उल्लेख केलेला दिसून येतो. संवादातून मनातील विचारांची देवाणघेवाण कशी चालते ते वाचकाला दाखविण्याचा प्रयत्न संवादातून त्या व्यक्तीची भाषा कळते. संवादातून आशयाला गती मिळते.

'प्रतिक्षा' या कादंबरीचे भारत-पाक युद्धातील भारत सैन्य व पाक सैन्य या काही व्यक्तिंची संवादातून माणुसकीची भावना कशी जागृत होते हे दाखविण्याचे काम पेंढारकर योग्यरितीने करतात. या कादंबरीत निवेदक संवाद रूपाने काहीकाही वेळा लेखक वावरताना दिसतो. उदा : 'फिरून खालची जमीन जादुनगरीसारखी रम्य दिसू लागते. वाटू लागतं हा विश्वाचे स्वामी आपणच।'

डॉ. बत्रा यांनी निवेदकाची ओळख करून दिली जाते,'हे आग्र्याच्या "इन्किलाब' वृत्तपत्राचे वार्ताहर श्रीयुत माथुर। '

त्याचप्रमाणे यश चौधरीनी माथूर म्हणून हाक मारली जाते - 'काय माथूर, कुठं पत्ता आहे?' 6

पाक अधिकारी मेजर हुसेन ज्यावेळी यश व निवेदक यांना शिक्षा दिल्यानंतर माणुसकीच्या दृष्टीने ते म्हणतात, ' मिस्टर माथूर, तुम्हांला त्रास झाल्याबद्दल मी दिलगीर आहे.'

निवेदक कल्पनेच्या आठवणीवर जगत रहातो तेव्हा - 'कल्पनेच्या पत्रे आहेत। '

निवेदक कल्पनेच्या वडिलांना कल्पनेच्या लग्नाविषयी विचारतो - 'मी म्हणालो, आपण रागावणार नसाल तर...... तर मी.... म्हणजे I would like to marry Kalpana - if you permit me!'' 7

"नायर म्हणाले, उत्तर साधं होतं - जीवनाबद्दल आसक्ती न उरलेल्या माणसापासून मृत्यू नेहमीच दूर पळतो.' अशा रितीने प्रभाकर पेंढाकरांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीतून संवादरूपाने कादंबरीचा आशय यशस्वीरितीने साधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**कादंबरीचे शीर्षक :**

'अरे संसार संसार' या कादंबरीत समाजातील मध्यमवर्गीय लोकांच्या संसारातील व्यथा विवंचना मांडण्याचे काम केले. संसारातील दु:खे, परिस्थिती यांचे वास्तववादी चित्रण योग्यरितीने मांडण्याचे कार्य कादंबरीत करतात. अशारितीने या कादंबरीला 'अरे संसार संसार ' हे नाव आशयाच्या दृष्टीने सार्थक ठरेल.

'प्रतिक्षा' ही कादंबरी भारत-पाक युद्धाचे वर्णन करणारी कादंबरी आहे. या कादंबरीत लेखक स्वतः निवेदन करतो... एक प्रकारची प्रतिक्षा आहे - आयुष्य ही एक प्रतिक्षा आहे। वेगवेगळया वेळी वेगवेगळया गोष्टींची। भावपूर्ण तरूण वयात कल्पनेच्या पत्रांची प्रतिक्षा होती। नंतर खांद्यावर एक चकाकता तारा मिळविण्याची, तो मिळाल्यावर कल्पनेच्या - माझ्या विवाहाची।

अशारितीने प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' ही कादंबरी शेवटी शोकात्मक बनते. माणसाची असणारी प्रतिक्षा शेवटी तो प्रतिक्षाच करत रहातो त्यादृष्टीने ही कादंबरी म्हणजे 'प्रतिक्षा' ही योग्यरितीने प्रभाकर पेंढारकरांनी कादंबरीला दिलेले शीर्षक सार्थ आहे.

* * *

## ** संदर्भ टिपा **

## ** प्रकरण चौथे 'ब' **


1. कादंबरी त्र १. वाडमय प्रकार जान्हवी संत प्रथम आवृत्ती नोव्हेंबर 1971.
2. 'प्रतिक्षा' प्रभाकर पेंढारकर विश्वकर्मा साहित्यालय पहिली आवृत्ती ।। फेब्रुवारी 1969 पृष्ठ 129.
3. " " " " " पृष्ठ 32.
4. " " " " " पृष्ठ 16.
5. " " " " " पृष्ठ 87.
6. " " " " " पृष्ठ 10.
7. " " " " " पृष्ठ 85.